**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/माध्य-३०१/२०२२-२०२३/[illegible]/दिनांक : 23 MAY 2023

प्रति,

मा. अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण, तथा मा. आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे -१.

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा मान्यता पत्र मिळणेस्तव प्रस्ताव सादर करणेबाबत
**नमूना एक क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाचा अहवाल सॅन कम राव फाऊंडेशन पुणे संचलित इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूल, सर्व्हे नं.८६,मौजे किवळे ता.हवेली जि. पुणे**

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२ कडील अधिसूचना दिनांक ५.१०.२०२०
२. मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील आदेश जा.क्र. आस्था/प्राथ-१०६/स्वयंअर्थ/२०२२/२६९७,दि.९.५.२०२२
३.मा. अध्यक्ष,राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील सभा दिनांक १४.५.२०२२
४.मा. अध्यक्ष,राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे तथा यांचेकडील आदेश जा.क्र. शि.सं.माध्य/स्वयंअर्थ/परिपत्रक/२०२२-२३/एस-४/४९७८, दि.२०.७.२०२२
५.मा. सहसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश जा.क्र. एसएफएस-१०२२/प्र.क्र. १४४/एसएम-२, दिनांक ८.१२.२०२२
.६.क्षेत्र स्तरीय प्राधिकरण पुणे यांचेकडील सभा दिनांक १२.५.२०२३ व्दारे प्रपत्र ड-१ अ.क्र. २३ दारे मान्य प्रस्ताव
७.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील प्रस्ताव जा.क्र. ७११४ दिनांक २२.५.२०२३

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत सादर करणेत येते की,शासनाकडील संदर्भीय क्र. १ चे अधिसूचनेचे अनुषंगाने क्षेत्र स्तरीय प्राधिकरण पुणे यांचेकडून प्रस्ताव शासनास सादर केलेनंतर सॅन कम राव फाऊंडेशन पुणे संचलित इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूल सर्व्हे नं.८६,मौजे किवळे ता.हवेली जि. पुणे या सी.बी.एस.ई संलग्नित इंग्रजी माध्यमाचे नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. १ ली ते इ.१२ वी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर शाळेचे मान्यतेकरिता काम सुरु करण्यास शासनामार्फत संदर्भीय क्र. ५ मधील अ.क्र. १ ते ९ मधील अटी व शर्तीसह इरादापत्र संदर्भीय क्र.५ नुसार प्राप्त झालेले आहे.

तत्पूर्वी सुधारित तपासणी सूचीनुसार प्रस्ताव सादर करावा यानुसार निर्देश मा. राज्यस्तरीय प्राधिकरणाकडून या कार्यालयास संदर्भीय क्र. २ नुसार प्राप्त झालेले होते. तसेच तदनंतर मा राज्यस्तरीय प्राधिकरणाकडील आढावा बैठकीत याबाबत निर्देश संदर्भीय क्र.३ दारे प्राप्त झाले होते. व अ.क्र. १ ते १२ मुददयाव्दारे मा. राज्यस्तरीय प्राधिकरणामार्फत संदर्भीय क्र. ४ व्दारे सूचना प्राप्त झालेल्या होत्या.तदनंतर संदर्भीय क्र. २,३,४ नुसारच्या बाबी अवलोकनार्थ घेऊन क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाच्या दि.१२.५.२०२३ च्या सभेत अ.क्र. २३ व्दारे उक्त शाळेचा प्रस्ताव मान्य झालेला आहे. तदनंतर मान्य प्रस्ताव सदस्य क्षेत्र प्राधिकरण तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांचेकडून संदर्भीय क्र. ७ व्दारे या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. संदर्भीय क्र. ५ व्दारे शासनाने निर्गमित केलेल्या इरादापत्रात नमूद असलेनुसार सन २०२२-२०२३ पासून खालील तपशीलानुसार या पत्रासोबत २ प्रतीत ऑफलाईन प्रस्ताव उक्त नविन शाळेस मान्यता मिळणेस्तव सादर करीत आहोत स्विकार व्हावा ही विनंती.

| अ क्र | संस्थेचे नांव | नवीन शाळेचे नांव व ठिकाण | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | माध्यम | शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सॅन कम राव फाऊंडेशन पुणे | इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूल सर्व्हे नं.८६,मौजे किवळे ता.हवेली जि. पुणे | सी.बी. एस.ई. | नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा | इंग्रजी | नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |

आपला विश्वासू

(औदुंबर उकिरडे)
अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर**
मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे तथा सदस्य ,राज्यस्तरीय प्राधिकरण
प्रत : माहितीस्तव रवाना :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे तथा सदस्य, क्षेत्र स्तरीय प्राधिकरण पुणे